# बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष

# साप्ताहिक वायदे बाजार अहवाल



## प्रकल्प अंमलबजावणी कक्ष- कृषी

## ०९.०३.२०२६

मा. बाळासाहेब ठाकरे कृषीव्यवसाय व ग्रामीण परिवर्तन प्रकल्प (स्मार्ट)

The World Bank assisted project: State of Maharashtra Agribusiness & Rural Transformation (SMART)

## १. कापूस (येथे क्लिक करून व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा → whatsapp.com/channel/0029VagMa2QB4hdbPmkQVr2P)

# मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

## जोखीम निवारण कक्ष

## भारतातील कापसाच्या व कपाशीच्या फ्युचर्स किमती

०६ मार्च २०२६

कापसाचे स्पॉट आणि फ्युचर्स भाव

| डिलिवरी तारीख | डिलिवरी केंद्र | किमत (Rs / Per Bales १७० Kg) |
|---|---|---|
| स्पॉट | राजकोट | २५,९१८ |
| ३१-Mar-२६ | राजकोट | २६,००० |
| ३०-Apr-२६ | राजकोट | २६,००० |
| २९-May-२६ | राजकोट | २६,२०० |
| ३०-Jun-२६ | राजकोट | २६,००० |
| ३१-Jul-२६ | राजकोट | २६,००० |

कपाशीचे स्पॉट आणि फ्युचर्स भाव

| डिलिवरी तारीख | डिलिवरी केंद्र | किमत (रु. प्रती २० किलो) |
|---|---|---|
| स्पॉट | राजकोट | १,५२० |
| ३०-Apr-२६ | राजकोट | १,५४९ |
| ३०-Nov-२६ | राजकोट | १,६०० |
| २६-Feb-२७ | राजकोट | १,६०० |
| | | |

| कपाशीचे हमी भाव (रु. प्रती क्विंटल) | | |
|---|---|---|
| | मध्यम धागा | ७,७१० |
| | लांब धागा | ८,११० |

- कापसाचे व कपाशीचे फ्युचर्स व्यवहार भारतात NCDEX व MCX एक्स्चेंज मध्ये केले जातात. येथे MCX एक्स्चेंज मधील किमती दिल्या आहेत.
- कापसासाठी राजकोट हे डिलिवरी केंद्र आहे. सर्व किमती या डिलिवरी केंद्रासाठी आहेत. यवतमाळ व जालना (महाराष्ट्र), कडी व मुंद्रा (गुजरात) आदिलाबाद (तेलंगण) ही इतर डिलिवरी केंद्रे आहेत.
- कपाशीसाठीसुद्धा राजकोट हे डिलिवरी केंद्र आहे. सर्व किमती या डिलिवरी केंद्रासाठी आहेत. कपाशीची प्रत २९ एम.एम. आहे.
- इतर तपशीलासाठी MCX च्या संकेत स्थळास भेट द्यावी (https://www.mcxindia.com)
- कापसाची किमत प्रती रु. ३५६ किलोची गाठ; कपाशीची किमत रु. प्रती २० किलो

- या महिन्याच्या २०२४-२५ U.S. कॉटन बॅलन्स शीटमध्ये कोणतेही बदल नाहीत.
- २०२४-२५ च्या जागतिक कापूस ताळेबंदासाठी, उत्पादन, उपभोग आणि व्यापार वाढला आहे तर या महिन्यात साठा कमी झाला आहे. सुरुवातीच्या साठ्यात बदलत नाहीत.
- पाकिस्तान आणि अर्जेंटिना पेक्षा चीनमध्ये जास्त उत्पादन.
- पाकिस्तान, बांगलादेश आणि इजिप्तमध्ये वापर वाढला असून ब्राझील आणि तुर्कीच्या निर्यातीत वाढ झाली आहे, ज्यामुळे ऑस्ट्रेलिया आणि इजिप्तच्या निर्यातीत घट झाली आहे. चीनकडून होणारी आयात कमी झाली आहे, परंतु पाकिस्तान, बांगलादेश आणि इजिप्तच्या वाढीमुळे ती भरून निघते. २०२४-२५ साठी Ending stocks ८०,००० गाठी कमी आहेत.




Source - MCX

२. **हळद** (येथे क्लिक करून व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा → whatsapp.com/channel/0029VagMa2QB4hdbPmkQVr2P)

## मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प

### जोखीम निवारण कक्ष



## भारतातील हळदीच्या फ्युचर्स किंमती

**०६ मार्च २०२६**

**हळदीच्या स्पॉट आणि फ्युचर्स किंमती**

| डिलिवरी तारीख | डिलिवरी केंद्र | किंमत (Rs./Quintal) |
|---|---|---|
| स्पॉट | | १४,३७० |
| २०-Apr-२६ | निझामाबाद | १४,६६८ |
| २०-May-२६ | निझामाबाद | १४,८३० |
| १९-Jun-२६ | निझामाबाद | १४,९९२ |
| २०-Aug-२६ | निझामाबाद | १५,१५४ |

- हळदीचे फ्युचर्स व्यवहार भारतात NCDEX या एक्स्चेंजमध्ये केले जातात.
- हळदीसाठी निझामाबाद हे डिलिवरी केंद्र आहे. सर्व किमती या डिलिवरी केंद्रासाठी आहेत. सांगली आणि वसमत (महाराष्ट्र), ईरोड (तामिळनाडू) ही इतर डिलिवरी केंद्रे आहेत.
- हळदीची किमत रु. प्रति क्विंटल साठी आहे.
- इतर तपशीलासाठी NCDEX च्या संकेतस्थळास भेट द्यावी. (https://www.ncdex.com)

- हळद हे भारतातील अतिशय महत्त्वाचे मसाल्याचे पिक आहे, संपूर्ण जगातील हळदीचे जवळजवळ ८०% उत्पादन आणि उपभोग हा भारतामध्येच होतो. जागतिक निर्यातीत भारताचा वाटा ६०% आहे.
- भारतीय हळदीमध्ये कर्क्युमिनचे (Curcumin) प्रमाण अधिक असल्याने जागतिक बाजारपेठेत सर्वोत्तम मानली जाते. तेलंगणा आणि आंध्र प्रदेश यांनी मिळून एकूण क्षेत्रफळाच्या ५०% भाग व्यापला आहे, आणि त्यानंतर महाराष्ट्र, कर्नाटक आणि तामिळनाडू यांचा क्रमांक लागतो.

- भारतात ताज्या हळदीची आवक जानेवारीच्या मध्यापासून सुरु होते आणि जूनपर्यंत चालू राहते.
- साठवलेले उत्पादन वर्षभर साठा करून ठेवले जाते.
- हळदीची पेरणी जूनच्या मध्यापासून ते ऑक्टोबर पर्यंत सुरु होते तर हळदीचे पीक पक्व होण्यासाठी १८०-२०० दिवस लागतात.




- वर्ष २०२४ ते २०३१ या कालावधीत जागतिक हळदीच्या बाजारपेठेत लक्षणीय दराने वाढ होण्याची अपेक्षा आहे.
- २०२१ मध्ये जागतिक हळदीच्या बाजारपेठेचे मूल्य USD १०८१.३४ दशलक्ष इतके होते आणि अंदाज कालावधीत ७.११% च्या CAGR ने वाढण्याची अपेक्षा आहे, २०३१ पर्यंत USD १६४०.१३ दशलक्ष पर्यंत पोहोचेल.
- २०२५ मध्ये हळदीच्या बाजारपेठेत लक्षणीय वाढ होण्याची अपेक्षा आहे, कारण वाढलेले उत्पादन, मजबूत देशांतर्गत तसेच निर्यात मागणी आणि हळदीवर आधारित उत्पादनांच्या जागतिक बाजारातील वाढत्या लोकप्रियतेमुळे या क्षेत्राला चालना मिळत आहे. लागवडीचा विस्तार होण्यामुळे उत्पादनात सुमारे २०% वाढ होण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे, तर निर्यातही सुमारे १४% ने वाढणार असल्याचे दिसते. याशिवाय, अन्न सुरक्षा मानकांचे काटेकोर पालन, जागतिक बाजारातील किमतींचा प्रभाव आणि ओलिओरेसिन, कर्क्युमिन यांसारख्या मूल्यवर्धित उत्पादनांची वाढती मागणी हे घटक देखील या बाजारपेठेच्या वाढीस हातभार लावत आहेत.

(स्रोत - Turmeric Outlook Report)

Source - NCDEX

(माहिती स्रोत: AGMARKNET व कृषी मंत्रालय, भारत सरकार)

**हा QR कोड स्कॅन करा किंवा येथे क्लिक करून व्हॉट्सऍपवर कनेक्ट व्हा लिंक -**

WHATSAPP.COM/CHANNEL/0029VAGMA2QB4HDBPMKQVR2P

---

अधिक माहितीसाठी

## बाजार माहिती विश्लेषण व जोखीम निवारण कक्ष

प्रकल्प अंमलबजावणी कक्ष (PIU) कृषी

**मा. बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्प**

सांख्यिंकी विभाग, दुसरा मजला, सेंट्रल बिल्डिंग नवीन,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, आगरकर नगर, पुणे- ४११००१

फोन : ०२०-२५६५६५७७, **टोल फ्री क्रमांक:** १८०० २१० १७७०,

ई-मेल : market.intelligence.smart@gmail.com

वेबसाईट : smart-mh.org